अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## उजनीची हाफ सेंच्युरी! दौंडमधून विसर्ग वाढला



**सोलापूर :** संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे लक्ष लागून असलेल्या उजनी धरणातील पाण्याच्या पातळीने हाफ सेंच्युरी पूर्ण केली आहे.

मंगळवारी सायंकाळी सहाच्या माहितीनुसार दौंडमधून ३३ हजार क्युसेकचा विसर्ग धरणात येवून मिसळत होता. टक्केवारी प्लसमध्ये ४८ टक्क्यांपर्यंत गेली होती. बुधवारी पहाटे उजनीने ५० टक्क्यांची पातळी पार करून पुढे गेली आहे.दौंडमधून फ्लो असाच कायम राहिला तर उजनी साठी गाठू शकेल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पुण्यातील खडकवासला धरण क्षेत्रात आणि आसपासच्या भागात संततधार पाऊस पडत आहे. त्यामुळे खडकवासला धरणातून मुठा नदीत पाणी सोडले जात आहे हे पाणी भीमा नदीवाटे थेट उजनी धरणात येत आहे.

www.surajyadigital.com । बुधवार, दि. ३१ जुलै २०२४ । वर्ष : २२ वे अंक : ३०२ वा किंमत : ५ रुपये पाने ८

# देणग्यांमधून पुढारी मालामाल, देशाची तिजोरी होतेय कंगाल

## आयकर कायदा १९६१ मुळे ओढवली नामुष्की



नवी दिल्ली/वृत्तसंस्था

**देशातील राजकीय पक्षांना देणग्या देणाऱ्यांना कर सवलत दिली जाते. परंतु त्याचा परिणाम हा सरकारी तिजोरीवर होऊ लागला आहे. २०२२ – २३ या आर्थिक वर्षात सरकारी तिजोरीवर सुमारे ३ हजार ९६७.५४ कोटींचा बोजा वाढला आहे. ही माहिती २०२४–२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात खुद्द अर्थ मंत्रालयानेच दिली आहे. हा आकडा २०२१–२२ च्या तुलनेत सुमारे १३ टक्के अधिक आहे. गेल्या ९ वर्षांपासून निवडणूक निधीमध्ये सातत्याने वाढ होत आहे. मागील केंद्रीय अर्थसंकल्पांच्या विश्लेषणातून हे स्पष्ट होत आहे.**

२०१४-१५ पासूनच्या नऊ वर्षांत राजकीय देणग्यांमुळे सरकारी तिजोरीवर सुमारे १२ हजार २७० कोटी रुपयांचा बोजा वाढला आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षाची आकडेवारी अद्याप जाहीर झालेली नाही. आलेली आकडेवारी २०१४-१५ ते २०२२-२३ या वर्षातील आहे.

अशा देणग्यांचा आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये सरकारी महसुलावर सर्वात जास्त परिणाम झाला आहे, जो ३ हजार ९६७.५४ कोटी रुपये इतका आहे. यामध्ये, कलम ८० अंतर्गत कॉर्पोरेट करदात्यांनी दिलेल्या देणग्यांचा महसूल सर्वात जास्त प्रभावित झाला आहे.तर २०२२-२३ मध्ये कॉर्पोरेट देणग्यांमुळे महसुलावर २००३.४३ कोटी रुपयांचा परिणाम झाला आहे.

आयकर कायद्याच्या कलम ८० आणि ८० नुसार- ''करदात्याच्या एकूण उत्पन्नाची गणना करताना, त्याने मागील वर्षात कोणत्याही राजकीय पक्षाला किंवा निवडणूक ट्रस्टला दिलेल्या देणगीची रक्कम वजा केली जाईल.'' तथापि, थेट रोखीने दिलेल्या कोणत्याही देणगीवर कपात करण्याची परवानगी नाही. लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ च्या कलम २९ अन्वये नोंदणी केलेल्या पक्षांना देणगी दिली जाते, हे देखील महत्वाचे आहे.

### असे का घडले?

हे सर्व आयकर कायदा, १९६१ मुळे घडले आहे. या कायद्यात राजकीय पक्षांना देणग्यांना करात सूट मिळेल असे सांगण्यात आले आहे. यानुसार, भारतीय कंपन्या, कंपन्या, व्यक्तींच्या संघटना, व्यक्ती किंवा हिंदू अविभक्त कुटुंब आणि इतर करदात्यांनी राजकीय पक्षांना देणगी दिल्यास, त्यांना कर कपातीचा लाभ मिळेल, अशी तरतूद करण्यात आली आहे.

### आयोगाने दिला होता इशारा

फुकट्या राजकीय पक्षांना मिळणाऱ्या देणगीची बाब केंद्रीय निवडणूक आयोगाच्या लक्षात आली होती.देशभरात दोनशेपेक्षा अधिक राजकीय पक्षांची नोंदणी झाली होती.त्यातील बहुतांशी राजकीय पक्षांनी निवडणूक न लढवता केवळ देणग्या उचलल्या. ह्या देणग्या म्हणजे ब्लॅक मनी व्हाईट करण्याचा धंदा धनदांडग्यांनी चालवला होता.तो आजही सुरू आहे.केंद्रीय निवडणूक आयोगाने याबाबत गंभीर इशारा दिला होता.

### पुढे काय झाले?

लहान राजकीय पक्षांना देणगी देऊन कर चुकवण्याचा प्रयत्न केला म्हणून इन्कम टॅक्स डिपार्टमेंटनी अनेक करदात्यांवर आणि कंपन्यांवर कारवाई चालू केली होती.मार्च २०२४ च्या माहितीनुसार या आरोपाखाली जवळपास ५ हजार नोटिसा पाठवण्यात आल्या यामध्ये वैयक्तिक करदाते आणि कंपन्यांचा समावेश आहे ज्यांनी नोंदणीकृत परंतु मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांना देणगी दिली. या नोटिसा २०२०–२१ आणि २०२१–२२ या आर्थिक वर्षांसाठी पाठवण्यात आल्या आहेत. या देणग्या करचोरी आणि मनी लॉंड्रिंगसाठी आहेत का, असा इन्कम टॅक्स डिपार्टमेंटला संशय आहे. आयकर विभागाच्या रडारवर असे अनेक करदाते आहेत, ज्यांनी किमान २० राजकीय पक्षांना देणगी दिली आहे हे राजकीय पक्ष नोंदणीकृत आहेत, परंतु त्यांना निवडणूक आयोगाकडून मान्यता मिळालेली नाही मान्यता नसलेले पक्ष म्हणजे ज्या पक्षांनी विधानसभेच्या किंवा राष्ट्रीय निवडणुका लढवल्या नाहीत किंवा निवडणुकीत त्यांना ठराविक टक्के मते मिळाली नाहीत.पुढे कारवाई काय झाली हे सांगायला कुणीच तयार नाही.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



हा अमावस्येलाच कामावर जाणार म्हणतोय!

| कल्याण |
| --- |
| 679-23-229 |

| मुंबई |
| --- |
| 590-43-166 |

